## फिर्याद

मनमाड शहर पोलीस स्टेशन,
नाशिक ग्रामीण.
दिनांक ०३/०३/२०२३

मी जितेंद्र उर्फ राजाभाऊ सुभाष जाधव, वय - ५२ वर्ष, व्यवसाय - बांधकाम व्यवसाय, राहणार- घर नंबर ७१, केकाण नगर, रापळी रोड, मनमाड, ता.नांदगांव, जि.नाशिक. मोबाईल नंबर - ९४२२२६२६४७

समक्ष पोलीस ठाण्यात हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे कुटुंबियांसह राहत असुन श्री.तय्यब अहमद शेख यांचे बसेरा कन्स्ट्रक्शन या फर्ममध्ये सब कॉन्ट्रॅक्टर म्हणुन काम पाहतो. तसेच सदर फर्मला मिळालेली कामे सुरू होण्यापासुन ते काम पुर्ण होईपावेतो प्रत्यक्षात कामकाजावर देखरेख ठेवणे व कामाशी संबंधीत शासकीय कार्यालयातील कागदपत्रांची पुर्तता व बिलांचा पाठपुरावा करण्याचे अधिकारपत्र मला देण्यात आलेले आहे. मी दिनांक ०२/०३/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल बागुल, शासकीय पंच व इतर स्टाफ यांची चांदवड-मनमाड रोडवरील शिंगवे येथील श्री.गुरुदत्त मंदीराजवळ भेट घेवुन परिचय करून घेतला.

त्यानंतर पंचांसमक्ष मी माझी तोंडी तक्रार सांगुन व स्वःहस्ताक्षरात लिहुन दिली की, मनमाड नगर परिषद हद्दीतील प्रकल्पांची दुरूस्ती करणेबाबत बसेरा कन्स्ट्रक्शनला वार्षिक कार्यादेश मुख्याधिकारी, मनमाड नगर परिषद, मनमाड यांचेकडुन देण्यात आलेला आहे. मा. मुख्याधिकारी, मनमाड नगर परिषद, मनमाड यांनी मनमाड नगर परिषद हद्दीतील प्रभाग क. २ मध्ये तांबोळी मेडीकल समोर शेख घर ते मेनरोड गटारीपर्यंत पाईप गटार करणे व मनमाड नगर परिषद हद्दीतील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प दहेगांव येथे F.S.T.P. टाकी प्रकल्प दुरूस्त करणे बाबत कार्यादेश दिल्याने सदरचे काम बसेरा कन्स्ट्रक्शन मार्फत मुदतीत पुर्ण करण्यात येवुन त्या संदर्भातील ४७७४७/- व ९४५६४/- रूपयांचे देयक मी नगर परिषद कार्यालयातील जमा केलेले होते. सदर देयकांबाबत मी वेळोवेळी जावुन विचारपुस करीत होतो. दिनांक ०१/०३/२०२३ रोजी मी मनमाड नगर परिषद कार्यालयात जावुन बिलाशी संबंधीत लिपिक श्री. आनंद औटी यांच्याकडे बिलांबाबत विचारपुस केली असता त्यांनी कार्यालयातील शिपाई श्री. नंदु म्हस्के यांना भेटुन घे असे सांगितल्याने मी शिपाई नंदु म्हस्के यांची भेट घेतली, त्यावेळी शिपाई नंदु म्हस्के याने तुमच्या बिलाचा चेक तयार आहे, परंतु लिपिक श्री. आनंद औटी यांनी त्या मोबदल्यात आमचे टक्केवारीनुसार ३६,०००/- रूपये दयावे लागतील आणि उदया परत बोलणी करण्यासाठी ऑफीसला ये असे सांगुन माझ्याकडे लाचेची मागणी केलेली आहे. मला मनमाड नगर परिषद कार्यालयातील लेखा विभागातील लिपिक श्री. आनंद औटी व शिपाई नंदु म्हस्के यांना लाच देण्याची ईच्छा नसुन त्यांच्यात व माझ्यात कोणताही आर्थिक अगर उसनवारीचा व्यवहार नाही, तसेच आमच्यात भांडणतंटा नाही. तरी त्यांचेवर कायदेशीर कारवाई होणेबाबत दिनांक ०२/०३/२०२३ रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक येथील पोलीस निरीक्षक श्री.अनिल बागुल यांचेकडे शासकीय पंचांसमक्ष माझी वरील प्रमाणे स्वःहस्ताक्षरात तक्रार लिहुन दिली. मी माझे तक्रारीसोबत मला दिलेले अधिकारपत्र हजर केले आहे. सदर तक्रारीवर मी सही केल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री.बागुल व पंचांनी सहया केल्या आहेत.

मी दिलेल्या तक्रारीनुसार नगरपरिषद कार्यालय, मनमाड येथील लेखा विभागातील लिपीक श्री.आनंद औटी व शिपाई श्री.नंदु म्हस्के हे खरोखर माझ्याकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याची पडताळणी करण्याकरीता पो.नि. श्री.बागुल यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून मला पंच श्री.प्रविण गोलाईत यांचे सोबत लिपीक श्री.आनंद औटी व शिपाई श्री.नंदु म्हस्के यांचे भेटीसाठी नगरपरिषद कार्यालय, मनमाड येथे जाण्यासाठी माझे जवळील दुचाकी वाहनाने चांदवड-मनमाड रोडवरील शिंगवे येथील श्री.गरूदत्त मंदीराजवळुन रवाना केले. त्यानंतर मी व पंच श्री.प्रविण गोलाईत असे नगरपरिषद कार्यालय, मनमाड येथील लेखा विभागात पोहचल्यानंतर मी, पंच श्री. प्रविण गोलाईत यांचेसह लिपीक श्री.आनंद औटी व शिपाई श्री.नंदु म्हस्के यांची भेट घेतली. आमच्यात झालेल्या चर्चेदरम्यान लिपीक श्री.आनंद औटी व शिपाई श्री.नंदु म्हस्के यांनी मी काम करीत असलेल्या बसेरा कन्स्ट्रक्शन या फर्मचे मनमाड नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क.२ मध्ये तांबोळी मेडीकल समोर शेख घर ते मेनरोड गटारीपर्यंत पाईप गटार करणे व मनमाड नगरपरिषद हद्दीतील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प दहेगांव येथे F.S.T.P. टाकी प्रकल्प दुरूस्त करणे बाबतच्या कामांचे देयकांचा धनादेश दिल्याच्या मोबदल्यात टक्केवारीप्रमाणे माझ्याकडे ३६,०००/- रूपये लाचेची मागणी केली. अशा प्रकारे नगरपरिषद कार्यालय, मनमाड येथील लिपीक श्री.आनंद औटी व शिपाई श्री.नंदु म्हस्के यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केली. त्यानंतर मी व पंच श्री.प्रविण गोलाईत असे पो.नि.बागुल व सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत पोहचल्यानंतर मी व पंच श्री.प्रविण गोलाईत रवाना केलेपासुन ते परत येईपावेतो घडलेल्या घटनेबाबत कथन केले. त्यानंतर पो.नि.बागुल व पथकाने व्हॉईस रेकॉर्डरमध्ये माझ्यात व लिपीक श्री.आनंद औटी व शिपाई श्री.नंदु म्हस्के यांचेत झालेले संभाषण ऐकल्यानंतर लिपीक श्री.आनंद औटी व शिपाई श्री.नंदु म्हस्के यांनी माझ्याकडे मी काम करीत असलेल्या बसेरा कन्स्ट्रक्शन या फर्मचे मनमाड नगरपरिषद हद्दीतील प्रभाग क.२ मध्ये तांबोळी मेडीकल समोर शेख घर ते मेनरोड गटारीपर्यंत पाईप गटार करणे व मनमाड नगरपरिषद हद्दीतील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प दहेगांव येथे F.S.T.P. टाकी प्रकल्प दुरूस्त करणे बाबतच्या कामांचे देयकांचा धनादेश दिल्याच्या मोबदल्यात बक्षिस म्हणुन टक्केवारीप्रमाणे ३६,०००/- रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केल्याची खात्री झाली.

त्यानंतर लिपीक श्री.आनंद औटी व शिपाई श्री.नंदु म्हस्के यांनी ३६,०००/- रूपये लाचेच्या रक्कमेची मागणी केली असल्याने पोनि बागुल यांनी मला लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितली, त्यावेळी माझ्याकडे इतके पैसे नसल्याने मी यशस्वी सापळा कारवाई दि.०३/०३/२०२३ रोजी करण्यात यावी म्हणुन सांगितले. त्याबाबत पोनि/बागुल यांनी सविस्तर पडताळणी पंचनामा केलेला आहे.

त्यानंतर दि.०३/०३/२०२३ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल बागुल, शासकीय पंच व इतर स्टाफ यांची चांदवड-मनमाड रोडवरील जिजाऊ लॉन्सजवळ भेट घेतली. त्यानंतर दि. ०२/०३/२०२३ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान मनमाड नगरपरिषद कार्यालयातील शिपाई नंदु म्हस्के याने लिपीक आनंद औटी यांचे सांगणेवरून माझ्याकडे देयकांचे टक्केवारीप्रमाणे ३६,०००/- रूपये लाचेची मागणी केलेली असल्याने पो.नि.अनिल बागुल यांनी मला ३६,०००/- रूपये लाच देण्यासाठीची रक्कम हजर करण्यास सांगितली. त्यावेळी मी माझ्याकडील बचतीमधील असलेले ५००/- रू. दराच्या ७२ चलनी नोटा असे एकुण ३६,०००/- रूपये पो.नि.श्री.अनिल बागुल यांचेसमक्ष हजर केले. त्यानंतर लिपीक श्री.आनंद औटी व शिपाई श्री.नंदु म्हस्के यांना देण्यासाठी हजर केलेल्या लाचेच्या नोटांचे वर्णन स्वतंत्र कागदावर लिहुन घेवुन त्यावर मी, पो.नि.श्री.अनिल बागुल व दोन्ही पंचांनी सहया केल्या. त्यानंतर सापळा पथकातील पो.ना/अहिरराव यांनी ॲन्थ्रासिन पावडर व अ.व्हा.दिव्याचे प्रात्यक्षिक करून दाखवुन मी हजर केलेल्या नोटांना दोन्ही बाजुने ॲंथ्रासिन पावडर लावुन लिपीक श्री.आनंद औटी व शिपाई श्री.नंदु म्हस्के यांना देण्याची लाचेची रक्कम ३६,०००/- रू. माझ्या पॅन्टच्या पुढील उजवे बाजुच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर पोनि श्री.अनिल बागुल यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि श्री.अनिल बागुल यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन ते सुरू करून माझेजवळ दिले. त्यानंतर पोनि श्री. बागुल यांनी मला पंच श्री. प्रविण गोलाईत यांचे सोबत लिपीक श्री.आनंद औटी व शिपाई श्री.नंदु म्हस्के यांचे भेटीसाठी मनमाड येथील नगरपरिषद कार्यालयातील लेखा विभागात जाण्यासाठी माझे जवळील दुचाकी वाहनाने चांदवड-मनमाड रोडवरील जिजाऊ लॉन्स जवळुन रवाना केले. त्यानंतर मी व पंच श्री.प्रविण गोलाईत असे मनमाड रेल्वे उड्डाणपुलाजवळील एस. एस. मोबाईल शॉपी जवळ पोहचल्यानंतर तेथुन पायी मनमाड नगरपरिषद कार्यालय येथे पोहोचलो. त्यावेळी पोनि श्री. अनिल बागुल, पंच श्री.साहेबराव महाजन व सापळा पथकाने आमचे मागोमाग येवुन मनमाड नगर परिषद कार्यालयातील पॅसेजमध्ये त्यांचे अस्तित्व लक्षात येणार नाही अशा प्रकारे उभे राहुन सापळा आयोजित केलेला होता. त्यानंतर लिपीक श्री.आनंद औटी व माझ्यात चर्चा चालु असतांना लाचेची रक्कम लिपीक श्री. आनंद औटी यांनी शिपाई श्री.नंदु म्हस्के यांचेकडे देण्यास सांगितले. त्यावेळी मी शिपाई नंदु म्हस्के यास 'देवु का' अशी विचारणा केली, त्यावेळी लिपिक आनंद औटी यांनी 'दे ना पैशाला कधी नही म्हणतो आम्ही' असे बोलल्यानंतर मी अ.पा. लावलेली लाचेची रक्कम ३६,०००/- रूपये उजवे हाताने पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुचे खिशातुन काढुन शिपाई श्री.नंदु म्हस्के यांचेसमोर धरली असता शिपाई श्री.नंदु म्हस्के याने ३६,०००/- रूपये लाचेची रक्कम स्विकारून ती दोन्ही हातांनी मोजुन रोखपाल श्री.संजीव आरोटे यांच्या ताब्यात दिली.त्यावेळी रोखपाल श्री. संजीव आरोटे यांनी सदर लाचेची रक्कम मोजुन त्यांचे टेबलच्या ड्रॉव्हरमध्ये ठेवली. त्यानंतर मी सदर कार्यालयाचे दरवाजाजवळ येवुन पो.नि श्री. बागुल व सापळा पथकास लाच स्विकारले बाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. ती वेळ अंदाजे ११:०५ वाजेची होती. त्यानंतर पोनि श्री. बागुल व सापळा पथकाने लिपीक श्री.आनंद औटी, रोखपाल श्री.संजीव आरोटे व शिपाई श्री.नंदु म्हस्के यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पंच श्री.साहेबराव महाजन यांचेकरवी रोखपाल श्री.संजीव आरोटे यांचे टेबलच्या उजवे बाजुस असलेल्या ड्रॉव्हरमध्ये असलेली अन्थ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम ३६,०००/- रूपये हस्तगत करण्यात आली. सदर कारवाई बाबत सापळापुर्व व यशस्वी सापळा कारवाई पंचनामा पोनि श्री. बागुल यांनी केला आहे.

तरी मी सब कॉन्ट्रॅक्टर म्हणुन काम करीत असलेल्या बसेरा कन्स्ट्रक्शन या फर्मने मनमाड नगरपरिषद हद्यीतील प्रभाग क्र.२ मध्ये तांबोळी मेडीकल समोर शेख घर ते मेनरोड गटारीपर्यंत पाईप गटार करणे व मनमाड नगरपरिषद हद्यातील घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प दहेगांव येथे F.S.T.P. टाकी प्रकल्प दुरूस्त करणे बाबतच्या कामांचे देयकांचा धनादेश दिल्याच्या मोबदल्यात बक्षिस म्हणुन टक्केवारीप्रमाणे मनमाड येथील नगरपरिषद कार्यालयातील लेखा विभागातील लिपीक श्री.आनंद औटी व शिपाई श्री.नंदु म्हस्के यांनी माझ्याकडे दि.०२/०३/२०२३ रोजी पंचांसमक्ष टक्केवारीनुसार ३६,०००/- रूपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि.०३/०३/२०२३ रोजी ११:०३ वाजेचे सुमारास मनमाड येथील नगरपरिषद कार्यालयातील लेखा विभागातील लिपीक श्री.आनंद औटी यांचे सांगणेवरून शिपाई श्री.नंदु म्हस्के यांनी पंचसाक्षीदार यांचे समक्ष स्विकारून ती रोखपाल श्री.संजीव आरोटे यांच्या ताब्यात दिली असता त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे, म्हणुन माझी १) श्री.आनंद प्रभाकर औटी, वय- ४६ वर्षे, वरिष्ठ लिपिक, लेखा विभाग, राहणार- अमृतानंद निवास, महात्मा फुले चौक, मनमाड, ता.नांदगांव, जि.नाशिक २) श्री.संजीव बबन आरोटे, वय- ५२ वर्षे, रोखपाल, लेखा विभाग, राहणार- ओम निवास, ललवाणी प्लॉट नंबर २८, स्वामी विवेकानंद नगर नंबर २, गणपती मंदीराजवळ, मनमाड, ता.नांदगांव, जि.नाशिक ३) श्री. नंदु पंडीत म्हस्के, वय - ५८ वर्षे, शिपाई, राहणार - साई सदर निवास, विवेकानंद नगर नंबर २, एम जी कॉलेजच्या मागे, मनमाड, ता.नांदगाव, जि.नाशिक, सर्व नेमणुक - मनमाड नगर परिषद मनमाड, ता. नांदगांव, जि. नाशिक यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील संगणीकृत फिर्याद मी वाचुन पाहिली ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

हि फिर्याद दिली
दि.०३/०३/२०२३

पोलीस ठाणे अंमलदार
मनमाड शहर पोलीस स्टेशन

जितेंद्र उर्फ राजाभाऊ सुभाष जाधव

Scanned with CamScanner